# हस्तपुस्तिका 1

## प्रस्तावनासंस्था, संस्थेची कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

### सुरक्षा खात्याची उद्दिष्टे

महापालिकेच्या मालमत्तेचे व पाणी खात्याची धरणे, जलवाहिन्या, जलाशये व इतर महत्त्वाच्या कामाच्या ठिकाणचे संरक्षण करणे.

### सुरक्षा खात्याचे कार्य व ध्येय

वरीलप्रमाणे

### सुरक्षा दलाचा इतिहास व तत्संबंधी माहिती

पूर्वी महापालिकेत 'सुरक्षा दल'अस्तित्वात येण्यापूर्वी संबंधित खातेप्रमुख पहारेकरी, कामगार-नि-पहारेकरी अशा पदांवर आपआपल्या गरजेनुसार कर्मचारी नेमीत असत. सदर कर्मचारी संबंधित खातेप्रमुखांनी नेमल्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना संबंधित खातेप्रमुखांचे आदेश मानावे लागत असल्यामुळे अनेक गैरप्रकार होत असत. या दलाचे मुख्य लक्ष्य म्हणजे असे गैरप्रकार रोखणे व प्रवेशद्वाराची सुरक्षा जपणे. सुरक्षा दल 'आर.पी.एफ.'च्या धर्तीवर काम करीत असून पोलीस दलासारखी कर्तव्ये बजावित असून संप, मोर्चे किंवा इतर कोणत्याही आणिबाणीच्या प्रसंगाला तोंड देण्याची क्षमता या दलामध्ये आहे.

सन 1964 साली सुरक्षा दलाची स्थापना झाली असून 01 मार्च 1966 साली सुरक्षा दल कार्यरत झाले. एक स्वतंत्र संस्था असली म्हणजे तिचे सर्व खात्यावर नियंत्रण राहील व सुरक्षा व्यवस्थेची आवश्यकता असल्यामुळे मुंबई महानगरपालिकेत सुरक्षा दल निर्माण करण्यात आले. हे दल निर्माण करण्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे वेगवेगळ्या खात्याच्या कामाच्या ठिकाणांचे संरक्षण या दलातील कर्मचाऱ्यांमार्फत करणे व ही जबाबदारी सुरक्षा दल पार पाडेल.

### सुरक्षा दलाची कर्तव्ये

हे दल स्थापन करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या चोऱ्या, अफरातफर, गैरप्रकार, अपघात, मारामाऱ्या इत्यादी प्रकार रोखण्यासाठी एक स्वतंत्र संस्था असणे, हे सर्व लक्षात घेता एक शिस्तबध्द दलाची गरज होती.

### सुरक्षा दलाचे मुख्य कार्य

या दलाचे मुख्य कार्य म्हणजे महापालिकेच्या सर्व खात्यांशी व स्थानिक पोलीसांशी समन्वय राखणे, आणिबाणीच्या कोणत्याही प्रसंगी पोलीस दलाची सहाय्यता या दलामार्फत पुरविली जाते.

### सुरक्षा दल पुरवित असलेल्या सेवा

महापालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण करणे.

**वेगवेगळ्या स्तरावरील पदनिहाय तक्ता जसे राज्य, संचलनालय, प्रदेश, जिल्हा, इत्यादी.**

मुंबई शहरात कुलाबा ते तानसा वैतरणा आणि दहिसर पर्यंत

प्रमुख सुरक्षा अधिकारी

↓

उप प्रमुख सुरक्षा अधिकारी

↓

विभागीय सुरक्षा अधिकारी

↓

सहाय्यक सुरक्षा अधिकारी

↓

सुरक्षा जमादार

↓

मुख्य सुरक्षा रक्षक

↓

मुख्य सुरक्षा रक्षक (सशस्त्र)

↓

सुरक्षा रक्षक

↓

सशस्त्र सुरक्षा रक्षक

**सुरक्षा दलाची कार्यक्षमता परिणामकारकपणे वाढविण्यासाठी जनतेकडून असलेली अपेक्षा**

कोणत्याही आणिबाणीच्या प्रसंगी या दलाच्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कर्तव्य परिणामकारकपणे बजाविण्यास सहकार्य करणे.

**जनतेच्या तक्रार निवारण आणि देण्यात येणाऱ्या सेवा यावर देखरेख ठेवण्यासाठी उपलब्ध यंत्रणा**

जनतेकडून तक्रारी आल्यानंतर उपलब्ध अभिलेख व दस्तऐवजानुसार महापालिकेच्या नियमाप्रमाणे उत्तर देणे.

सही/-

**प्रमुख सुरक्षा अधिकारी**

क्र. एसएफ/९९२१/सीएसओ